# जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग

मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोससिंधुदुर्गनगरी-,
ताकुडाळ., जिसिंधुदुर्ग., पिनकोड -416 812
दुरध्वनी क्रमांक -02362 - 228158, फॅक्स क्रमांक -02362 - 228589/228846

संकेतस्थळ - www.sindhudurg.gov.in ईमेल- colloffice@gmail.com


जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/ब्रेक द चैन/२०२१, दिनांक :- ३०/०४/२०२१

**वाचले :-**

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १४४.
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्रमांक नैआ/कोरोना विषाणू/ब्रेक द चैन/२०२१ दि. १४/०४/२०२१, २०/०४/२०२१, २२/०४/२०२१
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. गुनियो/गुनि ७/८/कोविड/ १४५०७/२०२१ दिनांक २७/०४/२०२१
८.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०४/२०२१ रोजीचे आदेश.

## विषय :- कोरोना विषाणू (कोविड १९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश

## :- आदेश-:

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंध कायदा, १८९७, दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २ ३, ४ मधील तरतूदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार रोखणे आणि त्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेणे आवश्यक झाले आहे. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील No DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्हयातील परिस्थिती प्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, वाचले क्र. ८ अन्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील आदेश No. DMU /२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०४/२०२१ अन्वये कोरोना विषाणू प्रादुर्भावाची साखळी खंडीत करणेकामी (ब्रेक द चैन) त्यांचेकडील दिनांक १३

एप्रिल, २०२१ व दिनांक २१ एप्रिल,२०२१ रोजीच्या आदेशात दिनांक १५ मे, २०२१ रोजी सकाळी ७.०० वाजेअखेर पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

त्याअर्थी, मी के. मंजूलक्ष्मी, अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये कोविड १९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकामी खालील बाबींच्या सुधारणेसह इकडील आदेश क्रमांक नैआ/कोरोना विषाणू/ब्रेक द चैन/२०२१, दि. १४/०४/२०२१, २०/०४/२०२१, २२/०४/२०२१ ला दिनांक १५ मे, २०२१ रोजी सकाळी ७.०० वाजेअखेर पर्यंत मुदतवाढ देत आहे.

**१. शेतीशी निगडीत कृषी सेवा केंद्र व त्यांच्याशी निगडीत उत्पादन व वाहतूक सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत चालू ठेवणेस परवानगी देण्यात येत आहे.**

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहीता १८६० (४५) याच्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हा आदेश आज दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

(के. मंजूलक्ष्मी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग

प्रति :- सर्व नागरिक व आस्थापना सिंधुदुर्ग जिल्हा.
प्रत :- १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
२. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग
३. जिल्हा शल्य चिकीत्सक, सिंधुदुर्ग
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदुर्ग
५ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग
६. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सिंधुदुर्ग
७. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
८. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
९. मुख्याधिकारी, नगरपालिका /नगरपंचायत /नगरपरिषद (सर्व)